विकसित भारत - रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (विकसित भारत - जी राम जी) कायदा, २०२५ च्या तत्वत: अंमलबजावणीबाबत

**महाराष्ट्र शासन**

**नियोजन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः मग्रारो-२०२६/प्र.क्र.४५(भाग-१)/मग्रारो-१**

मंत्रालय, मुंबई.

**दिनांक: ०८ मे, २०२६**

<u>वाचा :</u> केंद्र शासनाचे राजपत्र क्र. सी.जी.-डी.एल-अ-२११२२०२५-२६८६९६, दि. २१/१२/२०२५

<u>प्रस्तावना</u> :

संसदेने विकसित भारत रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (विकसित भारत जी राम जी) कायदा, २०२५ संमत केला असून दिनांक २१ डिसेबर, २०२५ रोजी भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिध्द झालेला आहे. त्यानुसार नरेगा (MGNREGA) कायदा, २००५ ऐवजी विकसित भारत २०४७ च्या राष्ट्रीय संकल्पनेशी सुसंगत असा नवीन कायदा तयार करण्यात आला आहे. सदर कायद्यातील कलम ३० नुसार ज्या राज्यांमध्ये यापूर्वीच अकुशल रोजगाराची हमी देण्यासंदर्भातील योजना / कायदा अस्तित्वात आहे. अशा राज्यांना त्यांचा कायदा केंद्रीय कायद्याशी सुसंगत ठेवण्याच्या अटीच्या अधिन राहून राज्यांना त्यांचा कायदा राबविण्याची मुभा देण्यात आली आहे. राज्यात अकुशल रोजगाराची हमी देण्यासंदर्भातील महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ हा कायदा अस्तित्वात असल्याने विकसित भारत - रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (विकसित भारत जी राम जी) कायदा, २०२५ या कायद्याची राज्यात अंमलबजावणी करण्यास तत्वत: मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

संसदेने पारित केलेल्या “विकसित भारत - रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (विकसित भारत - जी राम जी) कायदा, २०२५” ची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत रोजगार हमी प्रभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर मा. मंत्रिमंडळाने दिनांक २४.०३.२०२६ रोजीच्या बैठकीत सदर केंद्रीय कायद्याची राज्यात तत्वत: अंमलबजावणी करण्यास मान्यता दिलेली आहे. या संदर्भात मा.मुख्य सचिव यांनी निगर्मित केलेल्या दि.०१/०४/२०२६ च्या कार्यवृत्तास अनुसरून महाराष्ट्र राज्यात “विकसित भारत - रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (विकसित भारत - जी राम जी) कायदा, २०२५” ची तत्वत: अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

“विकसित भारत - रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (विकसित भारत - जी राम जी) कायदा, २०२५” कायद्याची राज्यात तत्वत: अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अंतर्गत वैयक्तिक / सामुहिक / सार्वजनिक लाभाच्या योजना

संदर्भातील तरतुदी अबाधीत ठेवून केंद्र शासनाच्या १२५ दिवसांच्या वैधानिक हमी नंतरच्या उर्वरीत कालावधीची अकुशल रोजगाराची वैधानिक हमी कायम ठेवण्यास देखील मान्यता देण्यात येत आहे.

तसेच नवीन केंद्रीय कायद्यातील तरतुदीनुसार योजना अंमलबजावणीच्या खर्चातील केंद्र व राज्य निधीची तरतूद अनुक्रमे ६०:४० च्या प्रमाणात करण्यास व आवश्यकतेनुसार लेखाशिर्ष उघडण्यासाठी नियोजन विभाग, वित्त विभाग यांच्या मान्यतेने महालेखापाल कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"विकसित भारत - रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (विकसित भारत - जी राम जी) कायदा, २०२५" कायदा केंद्र शासनामार्फत लागू केल्यानंतर राज्यात सदर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विकसित भारत - जी राम जी कायदा, २०२५ मधील कलम ३० नुसार महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये सुसंगत सुधारणा करण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात येवून मा.मंत्रिमंडळासमोर रोहयो प्रभागा मार्फत सविस्तर प्रस्ताव फेरसादर करण्यात येईल.

सदर शासन निर्णय दि.२४/०३/२०२६ रोजी मा. मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार नियोजन विभाग यांच्या अनौ. क्र. ५६/२०२६, दि.२२/०४/२०२६ व वित्त विभाग यांच्या अनौ. क्र. २३२/२०२६ /व्यय-८, दि.२८/०४/२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५०८१६०३४१०११६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by APPASO DHULAJ
Date: 2026.05.08 16:06:23 +05'30'

**(आप्पासो धुळाज)**
**सचिव (रोहयो),**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३) मा. मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव.
४) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५) मा. विरोधी पक्षनेता विधान सभा/विधान परिषद यांचे स्वीय सहाय्यक.
६) मा. समिती प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव.
८) सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग.
९) सर्व विभागीय आयुक्त.
१०) सर्व जिल्हाधिकारी.
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१२) सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
१३) सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे/ अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर).

१४) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय/ महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई प्रसिध्दीकरीता)

१५) सर्व उपायुक्त (विकास).

१६) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर.

१७) प्रधान महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर.

१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

१९) सर्व उप सचिव/ अवर सचिव/कक्ष अधिकारी नियोजन विभाग (रोहयो)

२०) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२१) निवडनस्ती रोहयो-१.